स्थायी समितीच्या **शनिवार** दिनांक 19–10–2013 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचे कार्यवृत्त.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | सभापती |
| 2. | श्री. पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 3. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 4. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 5. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 6. | सौ. विषया विकास खोब्रागडे | सदस्या |
| 7. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 8. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 9. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |
| 10. | सौ. मायाताई चितांमण इवनाते | सदस्या |
| 11. | श्री. देवेंन्द्र महादेव मेहर | सदस्य |
| 12. | श्री. अमान उल्लाह खान व. अब्दुल मजीद खान | सदस्य |
| 13. | सौ. सिमा सुनिल राऊत | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 2. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 3. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 4. | श्रीमती मिना दिलीप चौधरी | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, उप निगम आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 200</u> :– धरमपेठ झोन क्र. 2 मधील प्रभाग क्र.25, येथील टिळकनगर व धरमपेठ येथे रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण कामास्तव रु. 29,99,587/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 201</u> :– नागपूर महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लान्ट विभागाकरीता रस्ते बांधकाम साहित्य खरेदी करण्याच्या कामाकरिता एकूण प्राप्त नऊ निविदा पैकी मे. आर. बी.केवलरामानी यांनी सादर केलेली निम्मतम निविदा प्राकलनीय दरांपेक्षा 5.0 टक्के नी कमी दराची रु.2,00,20,538.00 राशीची निम्मतम निविदा स्विकृत करुन निविदेस मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 202</u> :– स्थायी समिती ठराव क्र.47 दिनांक 28.05.2012 अन्वये मे. सोनोसिटी असोशिएट नागपूर यांना (सी.जी.एच.एस. दरापेक्षा 7.5 टक्के कमी दर) नमुद दरावर प्रथम 5 वर्षाकरिता रु. 1 प्रति चौरस फुट प्रमाणे सदर रोग निदान केंद्र येथे प्रकल्प चालविण्याकरिता देण्यास स्थायी समितीने मंजुरी प्रदान केली.

सदर ठरावाचे मंजुरीनंतर सोनोसिटी असोसिएट व म.न.पा. यांचे दरम्यान करार करण्याकरीता करारनाम्याचा मसुदा तयार करण्यात येऊन वरिष्ठांच्या मंजुरीकरिता पाठविण्यात आला. ई.ओ.आय. नुसार करारनाम्याच्या मसुदयामध्ये जागा, विद्युत पुरवठा व पाणी देयके म.न.पा. देईल असे नमुद करण्यात आले होते. परंतू सदर मसुदयाला वरिष्ठांचे मंजुरीकरीता पाठविण्यात आले असता त्यांनी विज व पाणी म.न.पा. वहन करेल याबाबत आक्षेप घेतल्यामुळे विजेचे व पाण्याची देयके सोनोसिटी असोसिएट ही संस्था भरेल या अटीवर करारनाम्याचे मसुदयाला मा. आयुक्त यांनी मान्यता प्रदान केली.

मे. सोनोसिटी असोसिएट यांचेपत्र दि. 18.06.2013 च्या अनुषंगाने दि. 22.07. 2013 रोजी मा. अपर आयुक्त यांच्या कक्षात विज, पाणी देयके व दराबाबत वाटाघाटी करण्यात आली. या चर्चेच्या अनुषंगाने खालील मुदयावर सोनोसिटी असोसिएट या संस्थेनी आपली सहमती दर्शविली.

1. सदर प्रकल्पाकरीता विजेचे स्वतंत्र सबमिटर लावून येणाऱ्या देयकाचे प्रदान सोनोसिएट ही संस्था करेल.
2. सद्यस्थितीत असलेले सी.जी.एच.एस. दर प्रमाणे सामान्य रुग्णांकडून दर आकारण्यात येतील.
3. महानगरपालिका कर्मचारी व मा. नगरसेवक यांचकडून सी.जी.एच.एस. दराच्या 7. 5 टक्के एवढे सवलतीचे कमी दर आकारण्यात येतील.
4. सी.जी.एच.एस. दरामध्ये वाढ झाल्यास त्याप्रमाणे वरील अ.क्र. 2 व 3 मध्ये बदल करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

त्या अनुषंगाने पीपीपी प्रकल्पा अंतर्गत वरील 1 ते 4 मुद्यासह तयार करण्यात आलेल्या करारनाम्याच्या मसुदया प्रमाणे म.न.पा. अटी व शर्तीचे अधिन राहून मे. सोनोसिटी असोसिएट या संस्थेला प्रतिमहा एक रुपया प्रति चौरस फुट दराप्रमाणे जागा उपलब्ध करुन देण्यास्तव नमूद दरानुसार प्रथम 5 वर्षासाठी प्रकल्प चालविण्याकरीता मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन स्थायी समितीने यापूर्वी जो ठराव मंजूर केला होता, त्याच 7.5% कमी दराने नागरीकांना सुविधा देण्यास तसेच, कार्यालयाने दोन विद्युत सब मीटर लावावे, त्यातील एक सब मीटर सोनोसिटी असोसिएट च्या कार्यालयीन उपयोगासाठी जो विद्युत खर्च होईल त्यांचे भुगतान संस्थेस करावे लागेल. संस्थेद्वारे तपासणी करीता लागणारी यंत्र एक्सरे मशीन, सोनोग्राफी, मशीन व सिटीस्कॅन मशीन चे विद्युत देयक म.न.पा. वहन करेल, तसेच पाण्याचे देयक सुध्दा म.न.पा. वहन करेल या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 203</u> :— नागपूर महानगरपालिकेचे सन 2012—2013 चे वार्षिक लेखे स्थायी समिती समोर माहिती करीता ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 204</u> :— नागपूर महानगरपालिकेचे सन 2013—2014 चे अर्थसंकल्पातील व्यय पद क्र A22001330801 (ए.र.वि.यो/क्रीप तसेच इतर मुख्य रस्त्यांची सुस्थिती व दुरूस्ती) या पदामध्ये पुर्नविनियोजनाव्दारे (Re-appropriation) इतर व्यय पदामधून तरतुद वळती करून रू 30 कोटी अतिरिक्त तरतुद उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रश्न तसेच,

मनपाचे सन 2013—2014 चे अर्थसंकल्पात व्यय पद क्रमांक A22001330801 (ए.र.वि. यो/क्रीप तसेच मुख्य रस्त्यांची सुस्थिती व दुरूस्ती) मध्ये रू 15 कोटीची तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे परंतू या वर्षी अतिवृष्टीमुळे शहरातील प्रमुख रस्ते व ठरावांकित रस्त्यांची परिस्थिती अतिशय दयनिय झालेली आहे. व हया रस्त्यांचे दुरूस्तीकरीता कार्यालयाकडून अंदाजे रू 45 कोटीचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहे. त्यामुळे मनपाचे सन 2013—2014 चे अर्थसंकल्पतील व्यय पद क्रमांक A22001330801 मध्ये सदर अर्थसंकल्पातील इतर व्यय पदामधून रू 30 कोटीची रक्कम वळती करून रू 30 कोटीची तरतुद वाढविण्याबाबतचा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 कलम 103 अंतर्गत तरतुदीनुसार पुर्नविनियोजन (Re-appropriation) प्रस्ताव मंजूरीस्तव खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

( रू कोटी मध्ये )

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील व्यय पद क्रमांक | पदाचे नाव | सन 2013—2014 चे अंदाजपत्रकातील मूळ तरतुद | इतर व्यय पदामधून सरळ वळती करावयाची रक्कम | सदर पदामध्ये शिल्लक तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | A20200441804 | बांधील महसूल खर्चाची तरतुद उपलब्ध करून देणे | 25.00 | 5.00 | 20.00 |
| 2 | A40200470202 | बांधील भांडवली खर्चाची तरतुद उपलब्ध करून देणे | 25.00 | 5.00 | 20.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | A42001470511 | राष्ट्रसंत तुकडोजी रस्ते विकास कार्यक्रम ( सिमेंट कॉक्रिट चे रस्ते निर्माण ) | 40.00 | 10.00 | 30.00 |
| 4 | A42101370616 | नविन पुलाचे निर्माण | 30.00 | 10.00 | 20.00 |
| पुर्नविनियोजनाव्दारे एकूण वळती करावयाची रक्कम | | | | 30.00 | |

वर नमूद केल्याप्रमाणे सन 2013–2014 चे अर्थसंकल्पातील व्यय पद क्र. A22001330801 (ए.र.वि.यो/क्रीप तसेच इतर मुख्य रस्त्यांची सुस्थिती व दुरूस्ती ) मध्ये इतर व्यय पदामधील एकूण रू 30 कोटी ची रक्कम वळती करून एकूण रू 30 कोटीची तरतुद वाढवून देण्याबाबतच्या पूर्नविनियोजन प्रस्ताव ( Re-appropriation ) कृपया स्थायी समितीचे मंजूरीस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. सभागृहाकडे मंजूरीस्वत पाठविण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 205</u> :— प्रभाग क्र. 12 अ चारखंबा चौक व शेरे पंजाब हॉटेल समोरील चांभार नाल्याच्या भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार करण्यात आलेल्या रु. 36,76,721/— रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. 618 व नविन पद क्र. A43901370812 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 206</u> :— प्रभाग क्र. 66, रामेश्वरी येथील त्रिचरण चौक ते ओमकारगनर चौका पर्यंत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्यास्तव विभागाव्दारे तयार करण्यात आलेल्या रु. 7977645/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र.A22001330801 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 207</u> :— प्रभाग क्र. 71, अंतर्गत टाकडी सिम मधील यशोदानगर मुख्य रस्त्याचे पुर्नःडांबरीकरणाचे काम करण्यास्तव विभागाव्दारे तयार करण्यात आलेल्या रु. 2515439/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र.A22001330801 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 208</u> :— झोन क्र. 5, अंतर्गत प्रभाग क्र. 44—अ, दर्शन कॉलनी नाला येथील खचलेली भिंत दुरुस्त करणे व हिवरी नगर पुलाजवहील नाल्याची आर.सी.सी. रिटेनींग वॉलचे बांधकामास्तव विभागाव्दारे तयार करण्यात आलेल्या रु. 34,37,196/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र.A43901370812 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 209</u> :– सन २००८–२००९ चे मंजुर अंदाजपत्रकात महानगरपालिका आउटडोअर ॲडव्हरटायजिंग पॉलीसी २००१ मधील पुर्वी अस्तित्वात असलेल्या परिच्छेद २१(b) अंतर्गत प्रथम शोधकर्ता या तरतुदी मध्ये दुरुस्ती नंतर अस्तित्वात येणारा परिच्छेद खालील प्रमाणे आहे.

**"21 (b) :** "First Finder Policy: Nagpur Municipal Corporation has adopted additional clause no. 21 (b) to the existing Outdoor Advertising Policy 2001 as mentioned below. In case of first finder agency of any advertising site on Municipal Corporation property, the Commissioner with the approval of Standing Committee may permit the display of advertising to the agency for a maximum period of 3 years on payment of ground rent and advertisement fees as fixed by the Commissioner and on such terms and conditions as deemed fit, provided such advertisement fulfills the policy guidelines. Upon expiry of the said period of permission the agency shall handover the site with the structure to the Competent Authority. Thereafter, display of advertisement on the said would be allowed by inviting tenders and after taking approval of Standing Committee.

Any Agency/Person who are interested, may apply Estate Department, Nagpur Municipal Corporation.**"**

या अनुषंगाने प्रथम शोधकर्ता (First Finder) किंवा नविन प्रकारची जाहिरात (New Innovative) या तत्वावर मे. डायनामिटी इन्फ्रा सर्व्हिसेस यांना नागपूर शहरात ५० मन्युष्याव्दारे २' x ३' = ६ चौ. फुट आकाराचे विद्युत प्रकाशित जाहिरात बोर्ड पाठीवर वाहुन जाहिरात करण्याचे अधिकार देण्याबाबत मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. सभागृहाने मंजूर केलेल्या धोरणा नुसार, भविष्यात निविदा काढल्यानंतर प्रथम शोधकर्त्यांने सदर्हु निविदा महत्तम दरावर स्विकारण्याची सहमती दर्शविल्यास त्यांना प्रथम जाहिरात करण्याचे अधिकार देण्याबाबत निर्णय घेण्यात यावा. (Right to First Refusal) अन्यथा निविदेद्वारे महत्तम निविदाधारकास वाटप करण्याची कार्यवाही कार्यालयाने करावी. तसेच अटी व शर्ती मधील मुद्दा क्र. ४ मध्ये ग्रेस पीरेड सहा महीन्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

अटी व शर्ती

१. प्रथम शोधकर्ता (First Finder Policy) अंतर्गत बोर्डचे स्ट्रक्चर म.न.पा. स हस्तांतरीत करावयाचे असतात, परंतु सदर्हु बोर्ड मन्युष्याव्दारे पाठीवर वाहुन जाहिरात करण्यात येणार असल्यामुळे ही अट एजेन्सीस बंधनकारक राहणार नाही.

२. मन्युष्याव्दारे पाठीवर वाहुन विद्युत प्रकाशित बोर्ड व्दारे जाहिराती प्रदर्शन करावयाचे असल्यामुळे त्याकरीता प्रथम उप आयुक्त पोलीस, वाहतुक विभाग, नागपूर यांची लिखीत परवानगी सादर करावी लागेल.

३. प्रस्तावित जाहिरातीची वार्षीक शुल्क आकारणी जसे जाहिरात शुल्क, प्रिमियम, इत्यादी आगाऊ भरणा करावा लागेल तसेच ग्राउड रेंट व प्रिमियम मध्ये पुढील प्रथम नुतनीकरणास १०% आणि व्दितीय नुतनीकरणास १५% वाढ करण्यात येईल. यापासून महानगरपालिकेस ग्राऊड रेन्ट व जाहिरात शल्का अंतर्गत रु. ४,५३,७५०/– वार्षीक उत्पन्न प्राप्त होईल.

४. ऐजन्सीधारकास सदर्हु जाहिरात फलक उभारण्याकरीता ग्रेस पिरेड तीन महिन्याचा राहील.

<u>ठराव क्रमांक 210</u> :— सन २००८—२००९ चे मंजुर अंदाजपत्रकात महानगरपपालिका आउटडोअर ॲडव्हरटायजिंग पॉलीसी २००१ मधील पुर्वी अस्तित्वात असलेल्या परिच्छेद 21 (b) अंतर्गत प्रथम शोधकर्ता या तरतुदीमध्ये दुरुस्ती नंतर अस्तित्वात येणारा परिच्छेद खालील प्रमाणे आहे.

**“21 (b)** : First Finder Policy: Nagpur Municipal Corporation has adopted additional clause no. 21 (b) to the existing Outdoor Advertising Policy 2001 as mentioned below. In case of first finder agency of any advertising site on Municipal Corporation property, the Commissioner with the approval of Standing Committee may permit the display of advertising to the agency for a maximum period of 3 years on payment of ground rent and advertisement fees as fixed by the Commissioner and on such terms and conditions as deemed fit, provided such advertisement fulfills the policy guidelines. Upon expiry of the said period of permission the agency shall handover the site with the structure to the Competent Authority. Thereafter, display of advertisement on the said would be allowed by inviting tenders and after taking approval of Standing Committee.

Any Agency/Person who are interested, may apply Estate Department, Nagpur Municipal Corporation.**”**

या अनुषंगाने प्रथम शोधकर्ता (First Finder) किंवा नविन प्रकारची जाहिरात (New Innovative) या तत्वावर नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फुटपाथवर ८’ x ६’ = ४८ चौ. फुट आकाराचे ४० आणि डिव्हायडर्स वर २’.६’’ x ४’ = १० चौ. फुट आकाराचे १०० लॉलीपॉप (दोन्ही बाजुंनी) उभारुन जाहिरात करण्याकरीता परवानगी देण्याबाबत मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. सभागृहाने मंजूर केलेल्या धोरणा नुसार, भविष्यात निविदा काढल्यानंतर प्रथम शोधकर्त्यांने सदर्हु निविदा महत्तम दरावर स्विकारण्याची सहमती दर्शविल्यास त्यांना प्रथम जाहिरात करण्याचे अधिकार देण्याबाबत निर्णय घेण्यात यावा. (Right to First Refusal) अन्यथा निविदेद्वारे महत्तम निविदाधारकास वाटप करण्याची कार्यवाही कार्यालयाने करावी. तसेच अटी व शर्ती मधील मुद्दा क्र. ५ मध्ये ग्रेस पीरेड सहा महीन्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

अटी व शर्ती

१. संबंधीत प्रस्तावाचा ३ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर संबंधीत जाहीराती त्वरीत बंद करुन स्ट्रक्चर सहित जाहिरात फलक म.न.पा.स सुस्थितीमधे हस्तांतरीत करावे.
२. ज्या ठिकाणी यापूर्वी म.न.पा व्दारे विद्युत पोल आणि फुटपाथवर जाहिरातीचे अधिकार दिलेले आहेत किंवा देण्यात येणार आहेत, त्या ठिकाणी लॉलीपॉप/फलक उभारता येणार नाही.
३. ज्या डिव्हायडर्स वर विद्युत पोल नाही अशा ठिकाणीच लॉलीपॉप (फलक) उभारणे बंधनकारक राहील.
४. प्रस्तावित जाहीरातीचे जाहीरात शुल्क, ग्रा. रेंट, इत्यादी वार्षीक समान चार किस्तमधे सुरवातीस आगाऊ भरावी लागेल व ग्राउंड रेंट मधे दरवर्षी १० टक्के

वाढ करण्यात येईल. यापासून महानगरपालिकेस ग्राऊड रेंट व जाहिरात शुल्का अंतर्गत रु. १७,२९,२००/— वार्षीक उत्पन्न प्राप्त होईल.

५. ऐजन्सीधारकास सदर्हु जाहिरात फलक उभारण्याकरीता ग्रेस पिरेड तीन महिन्याचा राहील.

<u>ठराव क्रमांक 211</u> :— वर्धा रोडवरील हॉटेल रॅडीसन ब्लू ते एअर पोर्ट चौक ( हॉटेल प्राईड ) पर्यंतच्या रस्ता दुभाजकातील हिरवळ विद्या शिक्षण प्रसारक मंडळ अकॅडेमी ऑफ हायर एज्युकेशन (VSPMAHE) यांना पुढील 3 वर्ष कालावधीकरीता प्रायोजन म्हणून देखभालीकरीता देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन अश्या समकक्ष प्रस्तावास मंजूरी देण्याचे अधिकार ही स्थायी समिती आयुक्तांस मंजूरी प्रदान करण्याचे अधिकार प्रदान करते यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 212</u> :— प्रभाग क्र. 58 ब अंतर्गत बजरंगनगर, विश्वकर्मानगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत रु. 49,99,834/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र.A22001330802 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 213</u> :— प्रभाग क्र. 25 अ येथील रामनगर मरारटोली मैदान सभोवतालच्या रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण व पावसाळी नालीचे कामास्तव रु. 27,20,844/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र.A22001330803 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 214</u> :— नागपूर महानगरपालिकेतर्फे नागरिकांना निर्गमित करण्यात येणाऱ्या जन्म /मृत्यू दाखला हा मुळ अभिलेख असून, या दाखल्याचा वारंवार वापर होतो म्हणून दिर्घकाळ टिकणारा गुणवत्ता पुर्ण प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे खालील नमुद विशिष्ट दर्जाच्या कागदाची खरेदी करण्याकरिता सन 2013—14 च्या आयव्ययकातील पद क्र. A20100120214 प्रिंटेट स्टेशनरी या व्यय शिर्षातून अंदाजे रुपये 75,60,000/— खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा आणि ही खरेदी निविदा बोलावून करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

Paper Specification

1. Size A/4 - 210 mm x 297mm
2. Thickness - 125 micron
3. GSM- 170 GSM
4. Base - Polyster LMO is PET
5. Surface - White matte, Synthetic Fibre
6. Use- Offset & Digital Printing
7. Monogram - Foiling in printing background ( any color)

<u>ठराव क्रमांक 215</u> :– विधान सभेच्या सर्वसाधारण निवडणूका, 2013 च्या संदर्भाने भारत सरकार निवडणूक आयोगाचे आदेश क्र. 464/ओ.बी.सी. /2013/ई.ए.एस. दि. 05.11.2013 व अपर आयुक्त यांचे पत्र क्र. अ.आ./90/2013 दि. 09.12.2013 नुसार राजस्थान येथील नागोर जिल्हयातील देगना या विधानसभा मतदार संघासाठी निवडणूक निरीक्षक म्हणून, श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त, म.न.पा. यांची नियुक्ती भारत सरकार निवडणूक आयोगाने केली आहे.

या अनुषंगाने दि. 11.11.2013 ते 10.12.2013 पर्यंत मुख्यालय सोडण्याची अनुमती द्यावी असा अर्ज त्यांनी केला आहे.

करिता ही समिती त्यांच्या पत्राची नोंद घेत व मुख्यालय सोडण्याच्या अनुमतीस एकमताने मंजूरी प्रदान करते.

**सभापतीः–** आजच्या विषय पत्रिकेतील विषय क्र. 181 या विषयामध्ये एक वर्षाचा कालखंड या नस्तीने घेतला आहे. यात प्रशासनाकडून झालेल्या विलंबामुळे प्रोजेक्टच्या किंमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. 7 दिवसापेक्षा जास्त काळ नस्ती एका अधिका–याकडे /कर्मचा–याकडे प्रलंबित राहु नये, असे शासनाचे धोरण आहे. ही नस्ती या प्रचंड कालावधीत कुणाकडे प्रलंबित होती याची शहानिशा करून, या विलंबाबाबत कोण जबाबदार आहेत याची चौकशी करावी. या संदर्भात, जे कुणी दोषी आढळतील त्यावर नियमानुसार कार्यवाही करावी त्याचप्रमाणे, विषयाच्या अनुषंगांने दोन सुचना करण्यात येतात. (एक) नस्तीमध्ये चर्चा करावी असे लिहीत असतांना चर्चेचे स्वरूप फाईलमध्ये असले पाहिजे. साईड व्हिजीट लिहिल्यानंतर त्याची वेळ आणि आवश्यक अधिकारी वर्ग याचा उल्लेख देखील करावा. चर्चा कशा पध्दतीची आणि कोणत्या मुद्दयावर झाली याची विस्तृत माहिती त्या नस्तीत लिहिली पाहिजे. (दोन)साईड व्हिजीट करावी असे लिहितांना साईड व्हिजीट किती दिवसात झाली पाहिजे याचा स्पष्ट उल्लेख असावा. ती फाईल समोर जातांना त्या नस्तीमध्ये मौका चौकशी दरम्यान झालेली चर्चा व मौका चौकशी अहवाल या सर्व गोष्टी असल्या पाहिजे. असे लिहिले न गेल्यास अशा संबंधित अधिका–यावर कार्यवाही करण्याचे प्रस्तावित करण्यांत येते.

<u>ठराव क्रमांक 216</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर

सभापती<br>स्थायी समिती,

महानगरपालिका,नागपूर